॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगांव.६ ( ) उच्च शिक्षणातील गुणवत्ता अधिक वाढीला लागावी यासाठी रुसाच्या माध्यमातून विविध प्रयत्न केले जात असून महाविद्यालयांमध्ये अधिक पायाभूत सुविधा, संशोधनात वाढ आणि रोजगाराच्या संधी या निकषांवर रुसामार्फत महाविद्यालयांना निधी दिला जाणार असून या योजनेमध्ये अधिक महाविद्यालयांनी सहभागी होऊन प्रस्ताव पाठवावेत असे आवाहन राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) च्या राज्य संचालक मिता राजीव लोचन यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ज्या महाविद्यालयांचे नॅक प्रमाणित गुणांक २.५ पेक्षा जास्त आहे अशा अनुदानित तसेच शासकीय महाविद्यालयांच्या प्राचार्य व गुणवत्ता निर्धारण कक्ष समन्वयक यांची बैठक ६ जून रोजी विद्यापीठात झाली. या बैठकीत रूसाच्या २.० संदर्भातील मार्गदर्शक सूचना देताना श्रीमती लोचन बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रा.एस.टी.इंगळे, रुसाचे शक्तीसिंग चव्हाण, कुलसचिव भ.भा.पाटील उपस्थित होते.

मिता लोचन म्हणाल्या की, रुसाच्या माध्यमातून वेगवेगळया घटकांतर्गत निधी दिला जातो. ज्या महाविद्यालयांना नॅकचे ३.१ पेक्षा अधिक गुणांक प्राप्त झाले आहे त्या महाविद्यालयांना विद्यापीठाचा दर्जा दिला जात आहे. याशिवाय क्लस्टर विद्यापीठ या योजनेत तीन ते वीस एकत्रित महाविद्यालयांना हा दर्जा दिला जातो. मात्र यात ज्या महाविद्यालयांचे नॅकचे ३.५ पेक्षा जास्त गुणांक आहे अशा दोन आणि उर्वरित महाविद्यालयांचे ३.२ पेक्षा अधिक गुणांक हवे. क्लस्टर विद्यापीठासाठी ५५ कोटीचे अनुदान दिले जाते. ज्या महाविद्यालयांचे ३.५ पेक्षा जास्त गुणांक आहे त्यांना गुणवत्ता वाढीसाठी ५ कोटी रुपये दिले जाणार आहेत.

रूसाच्या २.० संदर्भातील मार्गदर्शक सूचना देताना श्रीमती लोचन म्हणाल्या की, ज्या महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर विभाग आहे, जिथे संशोधन केंद्र म्हणून मान्यता आहे, अभ्यासक्रम अद्ययावत करण्यात आले आहेत तसेच ज्या महाविद्यालयांमध्ये नियुक्ती कक्ष उभारण्यात आला असून त्याद्वारे अधिक जणांना रोजगाराची संधी मिळाली आहे अशा महाविद्यालयांचा या योजनेत समावेश केला जाणार असून त्यामध्ये २ कोटी रुपयांचा निधी महाविद्यालयांना प्राप्त होणार आहे. हा निधी महाविद्यालयांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी दिला जाणार असून त्यासाठी येत्या दोन दिवसात पोर्टलद्वारे महाविद्यालयांनी आपले प्रस्ताव दाखल करणे आवश्यक आहे. देशभरात १२८ महाविद्यालयांना अजुन हा निधी मिळू शकतो. त्यासाठी महाविद्यालयांनी प्रस्ताव पाठवावेत असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या व ज्या महाविद्यालयांचे नॅक प्रमाणित गुणांक २.५ पेक्षा जास्त आहे अशा अनुदानित महाविद्यालयांनी या योजनेत सहभागी व्हावेत असे आवाहन केले व ऑनलाईन माहिती भरण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. इतर विद्यापीठांच्या तुलनेत मागे असलेल्या विद्यापीठांना शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी अधिक अनुदान रुसाकडून दिले जावे तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडून फेलोशीप बंद झाली असल्यामुळे रुसा अंतर्गत फेलोशीप दिली जावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रारंभी प्रास्ताविकात प्र-कुलगुरु प्रा.माहुलीकर यांनी रुसा अंतर्गत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात झालेल्या कामाची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.भूषण चौधरी यांनी केले. कुलसचिव भ.भा.पाटील यांनी आभार मानले.

---

..२..

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**



**बातमी क्र.२**

जळगाव दि.६ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागात एम.ए.(एम.सी.जे.) अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा दि.१४ जुलै, २०१८ रोजी होणार आहे.

यु.जी.सी. पॅटर्ननुसार पत्रकारिता आणि जनसंवाद अभ्यासक्रमांची पुर्नरचना व रोजगाराभिमुख व कौशल्यावर आधारित करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक, मिडिया, जनसंपर्क, जाहिरात न्यू मिडिया क्षेत्रात करिअर करु इच्छिणाऱ्या युवकांना सुवर्ण संधी उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतो. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी **दि.१२ जुलै, २०१८** पर्यंत पत्रकारिता विभागात नाव नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संपर्क साधावा असे आवाहन विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड व डॉ.सुधीर भटकर यांनी केले आहे.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : ६ जून, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**स्वाक्षरीत प्रत/-**

**(डॉ.सुनील पाटील )**

जनसंपर्क अधिकारी